## लसीकरण सत्राचा दिवस

- सर्व लाभार्थ्यांना त्यांच्या देय लसी मिळतील याची खात्री करा
- लसीकरण स्थळाला स्वागतार्ह बनविण्यासाठी आशा आणि ए.एन.एम.ची मदत करा. रांगोळी काढणे, उपलब्ध सर्व स्थानिक साहित्याने सजावट, पाण्याची व्यवस्था करणे, बसण्याची व्यवस्था करणे इत्यादी कामात त्यांना मदत करा.
- लसीकरण स्थळाजवळील मनोरंजक खेळाच्या ठिकाणी लसीकरणासाठी आलेल्या मुलांसह इतर मुलांना खेळ, गाणी, नृत्य, कवितांचे गायन, रेखाचित्रे इत्यादीमध्ये व्यस्त ठेवता येईल.
- गरोदर स्त्रिया आणि पाच वर्षापर्यंतच्या मुलांच्या पालकांना त्यांच्या बाळाचे लसीकरण करण्यासाठी प्रोत्साहित करा
- लसीकरणासाठी आलेल्या पालकांना लसीकरणाच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या मोठ्या मुलांची काळजी घेण्यासाठी पुढाकार घ्या आणि मदत करा
- IMI 5 चा वापर करुन तुमच्या सोशल मीडियावर लसीकरणाच्या या विशेष सत्राची माहिती शेअर करा

## लसीकरण सत्रानंतर

- लाभार्थ्यांच्या संपर्कात रहा आणि लसीकरणानंतर त्यांना कसे वाटते ते जाणून घ्या
- आपल्या बाळाचे गंभीर आजारांपासून संरक्षण करण्यासाठी लसीकरण करुन एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याबद्दल पालकांचे अभिनंदन करा
- लसीकरणानंतर मुलाला ताप किंवा सूज आल्यास, कुटुंबाला सांगा की, काळजी करु नका किंवा घाबरु नका, आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना कळवा, ताप आल्यास आरोग्य सेविकेद्वारे दिलेला पॅरासिटामॉल सिरप द्या.
- लसीकरणाचे वेळापत्रक पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रोत्साहित करा
- कुटुंबांना U-Win वरुन लसीकरण प्रमाणपत्र डाउनलोड करण्यासाठी मदत करा

**सोशल मीडियावर उपलब्ध असलेली लसीकरणासंदर्भातील सर्व माहिती सत्य असेलच असे नाही, म्हणूनच भारत सरकार आणि राज्य सरकार यासारख्या विश्वसनीय स्त्रोतांकडून प्राप्त झालेल्या पोस्टवरच विश्वास ठेवा आणि फॉरवर्ड करा.**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार



# पाच वर्षापर्यंतच्या मुलांचे लसीकरण युवकांचे महत्त्वाचे काम




**सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**

**मिशन इंद्रधनुष्य ५.०** हा नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांना राहिलेल्या सर्व लसी देणे आणि आणि गोवर-रुबेला सारख्या आजारांपासून देश मुक्त करण्याचा एक मोठा प्रयत्न आहे. या मोहिमेत काही लसी राहिलेल्या गरोदर महिला आणि पाच वर्षांपर्यंतच्या बालकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी आपल्या परिसरात विशेष लसीकरण सत्र आयोजित केले जाईल. तुमच्या मुलाचे डिजिटल एमसीपी कार्ड तयार केले जाईल.

**७-१२ ऑगस्ट** | **११-१६ सप्टेंबर** | **९-१४ ऑक्टोबर**

**२०२३**






## लसीकरण सत्रापूर्वी

तुमच्या क्षेत्रातील आशा कार्यकर्ती/आरोग्य कर्मचाऱ्यांना गरोदर स्त्रिया आणि पाच वर्षांपर्यंतच्या मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि मिशन इंद्रधनुष 5.0 साठी लाभार्थी ओळखण्यासाठी आणि सर्व कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यासाठी मदत करा.

ज्यांनी लसीकरण सेवांसाठी U-WIN ऑनलाइन पोर्टलवर यापूर्वी नोंदणी केलेली नाही अशा लाभार्थ्यांना मदत करा. त्या कुटुंबाला U-Win चे फायदे समजावून सांगा की, एकदा नोंदणीकृत केल्यानंतर तुमच्या मुलाची लसीकरण माहिती तुम्हाला ऑनलाइन कुठेही सहज उपलब्ध होईल. त्यांना समजावून सांगा की, त्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल फोन नंबरवर नियोजित लसीकरणासाठी नियमित स्मरणपत्र संदेश प्राप्त करण्यासाठी उपयोगी ठरेल जेणेकरून त्यांच्या बाळाचे कोणतेही लसीकरण चुकणार नाही

तुमच्या समाजामध्ये लसीकरणाचे महत्त्व या विषयावर रॅली, गाणे आणि नृत्य, नाटक, भित्तीलेखन इत्यादी जागृती कार्यक्रमांचे आयोजन करा आणि त्यात सक्रिय सहभागी व्हा.

ज्या पालकांनी त्यांच्या मुलांचे यशस्वी लसीकरण केले आहे त्यांना ओळखून त्यांचे व्हिडिओ रेकॉर्ड करा आणि तुमच्या सोशल मीडियावर IMI 5 सह पोस्ट करा